महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था
नियामक मंडळ, पुणे यांचे कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

ई-मेलआयडी-regulatoryboard2019@gmail.com दुरध्वनी क्रमांक-०२०- २६१२२८४६/४७

१५६८

जा.क्र.पतसंस्था/सआ-५/नियामक मंडळ/कोविड-१९ कर्ज हप्तेवाढ योजना/सन २०२० दिनांक :१६ /१०/२०२०

**विषय – कोविड– १९ च्या अनुषंगाने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना "कोविड-१९ कर्ज हप्तेवाढ योजना" लागू करणे बाबत.**

**संदर्भ** – १. महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांच्या दि.२४/०९/२०२० रोजीच्या समिती सभेतील निर्णय.

कोरोना विषाणूच्या जागतिक संकटामुळे प्रत्येकाचे क्रयशक्तीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. जे कर्जदार यापूर्वी प्रामाणिकपणे व नियमितपणे कर्ज परतफेड करत होते, त्यांना कर्ज परतफेड करण्याची इच्छा असूनही सध्याच्या परिस्थितीमुळे ती परतफेड करणे शक्य होत नाही. याबाबतचा विचार करुन शासन निर्णय दि.२७ मे २०२० अन्वये शासनाने राज्यातील व्यवसायिक / नोकरदार यांना कर्जपुरवठा करण्यात नागरी सहकारी बँका व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थावर कोविड-१९ / लॉकडाऊनचे होणारे दूरगामी परिणाम व त्यावरील उपाययोजना याबाबतचा अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने शासनास सादर केलेला अहवाल विचारात घेऊन व महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १४४ २२-अ अन्वये प्राप्त अधिकारान्वये आणि याबाबत महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांच्या दिनांक २४/०९/२०२० रोजीच्या समिती सभेत सविस्तर विचारविनिमय होऊन, राज्यातील बिगरकृषी सहकारी पतसंस्थांसाठी **" कोविड - १९ कर्ज हप्तेवाढ योजना २०२० "** लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे .

**कोवीड १९ कर्ज हप्तेवाढ (Re-Schedulement) योजना :**

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावच्या पार्श्वभूमीवर उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करता, पतसंस्थांनी **" कोविड-१९ कर्ज हप्तेवाढ (Re-schedulement) योजना "** खालील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे राबवावी.

**अटी व शर्ती**

१. सदरची योजना फक्त मुदत कर्ज (टर्म लोन) साठी लागू राहील.

२. दि.३१/०३/२०२० रोजीच्या एन.पी.ए. निकषानुसार, उत्पादित कर्ज खात्यास ही योजना लागू राहील. यामध्ये ठेव कर्ज, सोनेतारण कर्ज, एलआयसी किंवा एनएससी कर्ज ही कर्जे एन.पी.ए. अंतर्गत येत नसल्याने, या कर्ज खात्यांना ही योजना लागू होणार नाही.

३. सदर योजनेमध्ये समावेश केलेल्या कर्जखात्यासाठी पूर्वीचाच खाते क्रमांक राहील व सदर योजनेमध्ये समावेश केलेल्या कर्जखात्यासाठी संगणकामध्ये स्वतंत्र कोड क्रमांक देण्यात यावा व दरमहा संचालक मंडळ सभेमध्ये अशा खात्यांचा आढावा घेण्यात यावा.

४. संस्थेच्या संचालक मंडळाचे स्तरावर संस्थेची आर्थिक स्थिती विचारात घेऊन, सदरची योजना राबविण्यात यावी. सदर योजनेअंतर्गत प्राप्त अर्जास संचालक मंडळाची पुर्वमंजूरी व संस्थेच्या लगतच्या होणाऱ्या वार्षिक अधिमंडळाचे सभेत कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक राहील. या

योजनेअंतर्गत पात्र कर्जदारांना संस्थेने लेखी कळवावे आणि ज्या कर्जदारांचे / सहकर्जदार व सर्व जामीनदार यांचे लेखी अर्ज प्राप्त होतील अशाच कर्जदारांचा यात समावेश करावा.

५. सदर योजनेनुसार रिशेडयुलींगच्या दिवशी कर्जदाराचा सध्याचा परतफेडीचा जो कालावधी शिल्लक आहे तेवढा कालावधी किंवा जास्तीतजास्त तीन वर्षाचा कालावधी वाढवून देता येईल. सदर कर्ज खात्याच्या रिशेडयुलींगचे वेळी कर्जाचा उर्वरित परतफेडीचा कालावधी हा तीन वर्षापेक्षा अधिक असला तरी सदर कालावधी कमाल तीन वर्षापर्यंतच राहील. मात्र परतफेडीचा हप्ता कालावधी कमाल तीन वर्षाच्या अधीन राहून कर्जदारांसाठी ऐच्छीक राहील. जे कर्जदार निकष पूर्तता करतील अशा कर्जदारांना सारखेच नियम व अटी लागू असतील. कर्जदारामध्ये कोणताही भेदभाव करता येणार नाही.

६. लॉकडाऊनच्या कालावधीमधील थकीत मुद्दल व व्याज विचारात घेऊन कर्जदाराच्या / सहकर्जदारांच्या / जामीनदारांच्या संमतीने व संचालक मंडळाच्या पूर्व मान्यतेने कर्जफेडीच्या हप्त्यामध्ये वाढ करण्यात यावी.

७. याबाबत कर्जदार / सहकर्जदार व जामीनदार यांचा विनंतीअर्ज घेऊन पूर्वीच्या करारासाठी नवीन दुरुस्ती करार / गहाणखत नोंदणीकृत दुरुस्ती लेख करुन कर्जफेडीची मुदत वाढविता येईल. यामध्ये अधिक कर्जरक्कम दिली जात नसल्याने नव्याने वचनचिठ्ठी घेण्याची आवश्यकता नाही. मात्र, कर्जाच्या कालावधीव्यतिरिक्त व्याजदर, मासिकहप्ता यामध्ये बदल असल्यास त्याचा दुरुस्तीलेखात समावेश करावा लागेल. तथापि, तारण (Security) व जामीनदार यामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करता येणार नाही.

८. सदर योजनेमध्ये अशा कर्जाबाबत संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षक व वैधानिक लेखापरीक्षक यांचेकडून तपासणी करुन घ्यावी व लेखापरीक्षण अहवालामध्ये याबाबतचे स्वतंत्र शेरे नमूद करणेबाबत संबंधीत लेखापरीक्षक यांना कळविण्यात यावे.

९. सदरचे हप्तेवाढ (रि-शेडयुल्ड) कर्ज अनुत्पादक झाल्यास त्यास एन.पी.ए. वर्गीकरणाचे असलेले सध्याचे प्रचलित एन.पी.ए. निकष लागू होतील.

१०. सदरच्या कालावधीसाठी कोणतेही अधिकचे शुल्क, फी, दंडव्याज, जादा व्याज आकारणी करण्यात येऊ नये. कॅश क्रेडीट कर्जासाठी मुदत कर्ज हप्तेवाढ वरील योजना लागू राहणार नाही. मात्र अशी कर्जे मुदतकर्जामध्ये रुपांतरीत करता येतील. कर्जदार / सहकर्जदार व जामीनदार यांचे विनंतीअर्ज घेऊन संचालक मंडळाच्या पूर्व मान्यतेने मुदतकर्जात रुपांतर करता येईल. यामध्ये जास्तीतजास्त मुदत पाच वर्षे देता येईल. याबाबत कर्जदार / सहकर्जदार व जामिनदार यांचा विनंती अर्ज घेऊन पूर्वीच्या करारासाठी नवीन दुरुस्ती करार / गहाणखत नोंदणीकृत दुरुस्ती लेख करुन कर्जफेडीची मुदत वाढविता येईल. यामध्ये अधिक कर्जरक्कम दिली जात नसल्याने नवीन वचनचिठ्ठी घेण्याची आवश्यकता नाही. मात्र, कर्जाच्या कालावधीव्यतिरिक्त व्याजदर, मासिकहप्ता यामध्ये बदल असल्यास त्याचा दुरुस्तीलेखात समावेश करावा लागेल. परंतु तारण (Security) व जामीनदार यामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करता येणार नाही. सदर योजनेमध्ये समावेश केलेल्या कर्जखात्यासाठी पूर्वीचाच खाते क्रमांक राहील. मात्र संगणकामध्ये स्वतंत्र कोड क्रमांक देण्यात यावा व दरमहा संचालक मंडळ सभेमध्ये या खात्यांचा आढावा घेण्यात यावा. अशा रुपांतरीत केलेल्या कर्जाबाबत संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षक व वैधानिक लेखापरीक्षक यांचेकडून तपासणी करुन घ्यावी व लेखापरीक्षण अहवालामध्ये याबाबतचे स्वतंत्र शेरे नमूद करण्याबाबत संबधीत लेखापरीक्षक यांना कळविण्यात यावे.

११. मुदत कर्जे ज्या दिवशी रिशेड्युलींग केले जातील व कॅश क्रेडीट कर्जाचे मुदत कर्जात रूपांतरण केले जाईल त्या दिवशी रिशेड्युलींग अथवा मुदत कर्जामध्ये रूपांतरीत होणारी रक्कम ही कोणत्याही परिस्थितीमध्ये मूळ मंजुरी रकमेपेक्षा अधिक असणार नाही. मूळ मंजूरीचे वेळेचे कर्जदार / सहकर्जदार व जामिनदार आणि तारण यात बदल होत असेल तर मात्र मुदत कर्ज रिशेडयुलिंग किंवा

कॅश क्रेडिट मुदत कर्ज रुपांतरण करता येणार नाही. यासाठी स्वतंत्र वचनचिठ्ठीची आवश्यकता नाही मात्र दुरुस्ती करार व गहाणखत दुरूस्तीवर पुर्वीच्याच मुळ कर्जाप्रमाणे सर्व संबंधीतांच्या सह्या असने आवश्यक आहे. दुरूस्तीकरार व गहाणखत नमुना संस्थेच्या अधिकृत वकिलांकडून प्रमाणीत करून घ्यावा. तसेच सदर मुदत कर्ज रिशेडयुलिंग किंवा कॅश क्रेडिट रुपांतरण प्रक्रियेनंतरही कागदपत्र पुर्तता वसुली प्रक्रियेसाठी योग्य असलेबाबत, अशा सर्व कर्जाबाबतीत एकत्रीत यादी करूण संस्थेचे अधिकृत वकीलांचे प्रमाणपत्र दिनांक १०/०१/२०२१ अखेर घेण्यात यावेत.

१२. संस्थेच्या उपविधीतील कर्जनिहाय महत्तम मुदत मर्यादा या योजनेपुरती शिथिल करण्यात येत आहे; मात्र, महत्तम कर्ज मर्यादेमध्ये कोणताही बदल नाही.

१३. या योजनेची अंमलबजावणी करण्यापूर्वी उपरोक्त नमूद १ ते १२ याप्रमाणे मार्गदर्शक सुचनांचे आधारे संस्थेने स्वतंत्र धोरण ठरवावे व सदर धोरणास लगतच्या पुढील होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्यता घेण्यात यावी.

उपरोक्त " **कोविड-१९ कर्ज हप्तेवाढ (Re-Schedulement) योजना** " ही केवळ कोविड-१९ च्या अनुषंगाने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे लागू करावयाची असल्याने, सहकारी पतसंस्थांनी सदर योजना दि.३१/०३/२०२० रोजीच्या एन.पी.ए. निकषानुसार उत्पादित असलेल्या कर्जखात्यासाठी असून या योजनेअंतर्गत प्राप्त होणा-या अर्जांची मंजुरी व अंमलबजावणी प्रक्रिया, संस्थेच्या संचालक मंडळाच्या पुर्वमान्यतेने दि.३१ डिसेंबर २०२० पर्यंत करावी.

**( अनिल कवडे )**
**अध्यक्ष, नियामक मंडळ**
**तथा सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति-

१. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२. जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (सर्व)
३. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) (सर्व)
४. अध्यक्ष, नागरी / ग्रामीण / कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., (सर्व).
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई
   सीटीसी क्र.११९/बी, तिसरा मजला, प्रमिला अपार्टमेंट, लकाकी बंगलोशेजारी, लकाकी रोड, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.
६. अध्यक्ष, नागरी / ग्रामीण / कर्मचारी सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन (सर्व).
७. कार्यासन अधिकारी, माहिती तंत्रज्ञान, मुख्यालय, पुणे.

२/- यांना कळविण्यात येते की, सहकार आयुक्त यांचे www.sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर परिपत्रक 'अधिसूचना' या सदराखाली परिपत्रके अंतर्गत "क्रेडीट सोसायटी" या वर्गात अपलोड करावी.

प्रत माहीतीसाठी-

१. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. अपर निबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) (सर्व) मुख्यालय, पुणे.
३. मा.प्रधान सचिव (सहकार) , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई-३२ (सविनय सादर).